शुक्रवार, २ नोव्हेंबर २०१२
पुणे टाइम्स | II

# आठवणी अजरामर काव्यप्रतिभेच्या

**कवयित्री शांता शेळके यांच्या बदारदार कविता 'असेन मी नसेन मी' या कार्यक्रमात नुकत्याच सादर झाल्या.**



तन्मयी मेहंदळे,
कॉलेज क्लब रिपोर्टर,
स.प. महाविद्यालय

शब्दांचा आणि लोककलेचा गोडवा ज्यांच्या लेखनात जाणवतो त्या शांताबाई... जपानी भाषेतील 'हायकू', संस्कृत भाषेतील कालिदासाचं 'मेघदूत' यांसारख्या अजरामर साहित्याचे मराठी अनुवाद आपल्या अनोख्या शैलीत त्यांनी केले आणि साहित्याचा उत्तम नमुना सादर केल्या.

आडकर फाउंडेशनतर्फे प्रमोद आडकर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके यांच्या ९०व्या जयंतीनिमित्त 'असेन मी नसेन मी' ही कवितांची मैफल भरली. यावेळी पूर्वार्धामध्ये ५००व्या कार्यक्रमानिमित्त गायिका शुभांगी मुळे यांचा सत्कार करण्यात आला. पत्रकार माधव गोखले, मसापच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य आणि विवेक कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. पूर्वार्धाचं सूत्रसंचालन अंजली महागावकर यांनी केलं. ही वाट दूर जाते, वादळ वारं सुटलं गं, शरद सुंदर चंदेरी राती, रेशमाच्या रेघांनी, असेन मी नसेन मी... यांसारख्या वैविध्यपूर्ण आणि उत्तम रचनांनी शांताबाईंनी मराठी संगीतक्षेत्राला बहारदार केलंय. या रचनांना आपल्या नाजूक रसाळ आवाजात गुंफलं, ते शुभांगी मुळे यांनी. पप्पा सांगा कुणाचे, किलबिल किलबिल पक्षी बोलती... आदी लहानग्यांना आवडणारी गाणीही शुभांगी मुळे यांनी यावेळी सादर केली. आपल्या तडफदार आवाजात अविनाश सलगरकर यांनी जे वेड मजला लागले, दाटून कंठ येतो, तोच चंद्रमा नभात... ही गाणी गाऊन वेगळंच वातावरण निर्माण केलं. हेमंत वाळुंजकरांनीही आपल्या वेगळ्या ढंगातील गायकीनं उपस्थितांची मनं जिंकली.

या कार्यक्रमाला हार्मोनियमवर जयंत साने, साइड रिदम आदित्य आपटे, तर तबल्याला मोहन पारसनीस यांनी साथसंगत केली.

संपूर्ण कार्यक्रमाचं संगीत संयोजन आणि की-बोर्डची साथ केदार परांजपे यांनी केली. उत्तरार्धाचं सूत्रसंचालन आपल्या अनोख्या बाजात नीना भेडसगावकर यांनी केलं. प्रसिद्ध तबला वादक विनायक फाटक यांची उपस्थितीही यावेळी लाभली.